## रेल्वे अपघात; जखमी तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : सोलापूर -धावत्या रेल्वेतून कोसळून गंभीर जखमी झालेला तरुण शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी पहाटे मयत झाला. हा अपघात रविवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक ३ येथे घडला होता. कृष्णा मारुती जाधव (वय ३० रा. सेटलमेंट फ्री कॉलनी) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.रविवारी दुपारी तो वाडीच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेतून खाली कोसळल्याने त्याचे दोन्ही पायास गंभीर जखमा झाल्या होत्या. त्याला लोहमार्ग पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो पहाटे मरण पावला. या घटनेची नोंद रेल्वे पोलिसात झाली. हवालदार सुरवसे पुढील तपास करीत आहेत.


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड








www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १५ ऑक्टोबर २०२४ । वर्ष : २३ वे अंक : १८ वा किंमत : ५ रुपये पाने ८


# दिवस उजाडला,काळ जिवावर बेतला कष्टातून उभारलेला संसार मोडला

## विहिरीतील पाण्यात बुडून पती-पत्नीचा मृत्यू

## द.सोलापूर तालुक्यातील बाळगी गावावर शोककळा

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी

**काळ आणि वेळ एकत्र आले की,ते कुणावर घाला घालतील याचा नेम नाही.दक्षिण सोलापूर तालुक्यातील बाळगी या गावात अगदी तेच घडले.सोमवारचा दिवस उजाडला. नवरा-बायको शेतीच्या कामाला लागले.पती द्राक्ष बागांवर औषध फवारणीसाठी गेला.बायको कपडे धुण्यासाठी जवळच्याच विहिरीवर गेली. तिथे पाय घसरून पडल्याचे दिसताच नवऱ्याने तिकडे धाव घेतली.तिला वाचवण्याचा नवऱ्याने अटोकाट प्रयत्न केला पण दोघेही पाण्यात बुडून मरण पावले. संगप्पा चंदाप्पा कोळी (वय ३८) व सुनिता उर्फ सावित्री संगप्पा कोळी (वय ३१) असे मरण पावलेल्या पती-पत्नीची नावे आहेत.ही घटना सोमवारी सकाळी अकरा वाजता घडली.**

या दुःखद प्रसंगाचे वृत्त असे कि, कोळी कुटुंबाची बाळगी गावालगत शेती आहे. सकाळी घरातील कामे झाल्यानंतर पती संगप्पा हा शेतीच्या कामात गुंतला होता.द्राक्ष पिकावर तो औषधांची फवारणी करत होता तर पत्नी सुनिता ही सकाळी साडे दहा वाजता कपडे धुण्यासाठी वस्तीलगतच्या विहिरीवर गेली. कपडे धुत असताना तोल जावून ती पाण्यात पडुन बुडू लागली. विहिरीतून ओरडण्याचा आवाज ऐकून संगप्पा कोळी याने पत्नीला वाचविण्यासाठी विहिरीत उडी मारली. तेव्हा बुडणाऱ्या सुनीताने संगप्पाला मिठी मारली. यामुळे दोघेही दोघे पाण्यात बुडाले.३५ फूट खोल पाण्यात दोघांचाही बुडून मृत्यू झाला.

हा प्रकार पाहून संगप्पाचा भाऊ रेवाप्पा यांनी गावातील तरुणांना ओरडून मदतीसाठी बोलावले. त्यानंतर एक तासाच्या प्रयत्नानंतर बुडालेल्या दोघा पती पत्नीला तरुणांनी विहिरीतून बाहेर काढले.



पती संगप्पा कोळी



पत्नी सावित्री कोळी

दरम्यान या घटनेची माहिती मिळतात मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर पंचनामा करून दोघा पती-पत्नीचे मृतदेह ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी पाठवले. मंद्रुप पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद झाली आहे.

### बाळगी गावावर शोककळा

मयत संगप्पा कोळी हा बाळगी गावच माजी सरपंच होता. सात महिन्यांपूर्वी त्याने राजीनामा दिला होता. ही घटना समजतात संपूर्ण गाव विहिरीवर गोळा झाले होते. संगाप्पा कोळी यास एक मुलगा व एक मुलगी आहे.ही दोनही मुले-बाळे लहान आहेत. आई-वडील गेल्याने दोन्ही बालके अनाथ झाली. या दुर्देवी घटनेनंतर बाळगी गावावर शोककळा पसरली आहे.

### संसार मोडला.

मयत संगप्पा व त्याचा भाऊ या दोघांनी मिळून अडीच एकर शेती घेतली होती.विहिरीच्या पाण्यातून ही शेती बागायत केली होती.सहा महिन्यांपूर्वी दोघा भावांनी मिळून शेतातच घर बांधले होते. संगप्पा,त्याचा भाऊ व मयत सुनिता हे तिघेही शेतात कष्ट करायचे.सुनिता ही संगप्पाची भाची.कष्टातून उभा राहिलेला संसार एकाएकी मोडला.हा दुर्दैवी प्रसंग पाहून संगप्पाच्या आईला दुःखाश्रू अनावर झाले होते.आईचा हंबरडा ऐकून साऱ्या गावाचे डोळे पाणावले होते.

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या



**सोलापूर** : माहेरी राहण्यास आलेल्या एका ३३ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना तेलगाव सिना (ता. उत्तर सोलापूर) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. कविता काकासाहेब डुबल (वय ३३ रा. देगाव ता.पंढरपूर) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास तिने घरातील छताच्या पंख्याला फेटाच्या (पटका) सहाय्याने गळफास घेतली होती. त्याला रामदास माने (भाऊ) यांनी फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## वीटभट्टी कामगाराची आत्महत्या

**सोलापूर** : एका ४६ वर्षीय वीटभट्टी कामगाराने दारूच्या नशेत राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उ.सदर बजार परिसरातील शास्त्री नगरात सोमवारी घडली . मारुती हनुमंतु बंटपामन असे मयताचे नाव आहे. त्याने छताच्या लाकडी वाशाला साडीने गळफास घेतला होता. त्याला शासकिय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत मारुती याच्या पश्चात पत्नी १ मुलगा १ मुलगी आणि वडील असा परिवार आहे. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

## राज्यपाल नियुक्त आमदार; ७ नावांवर शिक्कामोर्तब

**मुंबई** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यासाठी अवघे काही दिवस बाकी असताना राज्य सरकारकडून राज्यपाल नियुक्त १२ जागांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. भाजपकडून तीन तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून प्रत्येकी दोन जागांसाठीच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे समजते.

भाजपकडून राज्यपाल नियुक्त विधानपरिषद आमदार म्हणून पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्यासह विक्रांत पाटील आणि बाबू सिंग महाराज राठोड यांना संधी देण्यात आली आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांचे पुत्र पंकज भुजबळ आणि सांगली-मिरज-कुपवाडचे माजी महापौर इद्रिस नायकवडी यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं आहे. तसंच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनं माजी खासदार हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांना विधानपरिषदेवर संधी देण्याचे ठरवल्याची माहिती आहे.



चित्रा वाघ

महाराष्ट्र विधानपरिषेदतील राज्यपाल नियुक्त १२ जागांचा तिढा बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. महाविकास आघाडी सरकार असताना राज्यपालांनी या यादीच्या मंजुरीला विलंब केल्यानंतर हे प्रकरण कोर्टात गेले होते. त्यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या आधी या जागांची नियुक्ती व्हावी, यासाठी महायुतीकडून प्रयत्न केले जात होते. या १२ जागांमध्ये भाजपला सहा, शिंदेंच्या शिवसेनेला तीन, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला तीन जागा, असा फॉर्म्युला ठरवण्यात आल्याची चर्चा होती. या १२ पैकी आता महायुती सरकारने सात जागांच्या नावांवर शिक्कामोर्तब केलं आहे.

### भाजपकडून चित्रा वाघ, विक्रांत पाटील अन् बाबूसिंग महाराज फायनल

## ट्रकच्या धडकेने दुचाकी वरील महिला ठार

### भंडीशेगाव येथील घटना; पती आणि मुले जखमी

**पंढरपूर** : वेगाने जाणारा ट्रक पाठीमागून दुचाकीला धडकल्याने महिला ठार तर तिचा पती आणि दोन मुले गंभीर जखमी झाले.

हा अपघात पंढरपूर ते वेळापूर रोडवरील भंडीशेगाव पालखी तळाजवळ रविवारी दुपारच्या सुमारास घडला . अश्विनी अमोल गवळी (वय २८ रा. भाळवणी ता.पंढरपूर ) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. रविवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास ती पती अमोल गवळी (वय ३४) आणि तिच्या दोन्ही मुलांसोबत दुचाकीच्या पाठीमागे बसून पंढरपूर ते वेळापूर रोडने निघाले होते. भंडीशेगाव येथे पाठीमागून येणारा सिमेंट वाहतुकीचा एमएच१२-एमव्ही- ७१६१या क्रमांकाचा ट्रक धडकल्याने चौघेजण खाली कोसळून गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी अश्विनी गवळी ही उपचारापूर्वी मयत झाली. या प्रकरणी पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी अपघातानंतर फरार झालेल्या ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार करचे पुढील तपास करीत आहेत.

## आई वडिलांना ठार मारण्याची धमकी देत केला अत्याचार

सोलापूर/प्रतिनिधी

तुझ्या आई-वडिलांना व भावाला मी मारून टाकीन असे वारंवार फोनवर धमकावून दोन महिन्यापासून जबरदस्तीने अत्याचार केल्याप्रकरणी तरुणाच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

२ जुलै २४ पासून ते ३० सप्टेंबर २४ दरम्यान संशयित आरोपी समर्थ सतीश खुर्द (रा.सोलापूर) याने वारंवार फोन करून मी तुझ्या आई-वडिलांना व भावाला ठार मारेन अशी धमकी देत मानसिक त्रास देत होता. घटनेच्या दिवशी एका कॅन्टीनमध्ये बोलावून नको म्हणत असताना त्यान ३ ते ४ वेळा शारीरिक संबंध केले.तसेच आई-वडिलांना प्रत्यक्ष भेटून मी तुमच्या मुलाला व तुम्हाला ठार मारेन, अशी धमकी दिली. पिडीत तरुणींने आईच्या मदतीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात त्या तरुणाच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून, मसपोनि.घोरपडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## मराठी अभिनेते अतुल परचुरे यांचे निधन



**मुंबई** : मराठी अभिनेते अतुल परचुरे यांचं निधन झालं आहे. वयाच्या ५७ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. काही वर्षांपूर्वी त्यांना कॅन्सरचं निदान झाले होते. तेव्हा त्यांचं वजन झपाट्याने कमी झाले होते. दोन दिवसांपूर्वीच त्यांना तब्येत बरी नसल्याने पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, सोमवारी त्यांचे निधन झाले, त्यांच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगी आहे. 'तरुण तुर्क म्हातारे अर्क', 'प्रियतमा', 'वासूची सासू', 'आम्ही आणि आमचे बाप' या नाटकांमध्ये त्यांनी भूमिका साकारली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आचारसंहितेच्या आत सगळं पूर्ण करा!

| कल्याण |
| --- |
| 126-91-245 |

| मुंबई |
| --- |
| 125-80-299 |

# काकांच्या 'पिच'वर पुतण्याची 'गुगली'

## मोहोळ, इंदापूरला कोटींची भेट देवून दादांनी लावली जबरदस्त फिल्डिंग

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची मंगळवारी आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्याच्या पूर्वसंध्येल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रीमंडळाची बैठक झाली. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ आणि पुणे जिल्ह्यातधील इंदापूर तालुक्यातील गेमचेंजर प्रकल्पांना कोटींनी निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी खास करून हा निधी देवून दत्तामामा भरणे, माजी आमदार राजन पाटील व विद्यमान आमदार यशवंत माने यांना बूस्टर डोस दिल्याचे मानले जात आहे.अजितदादांचे काका शरद पवार यांनी इंदापूर आणि मोहोळसाठी जबरदस्त फिल्डिंग लावली आहे.त्याला शह देण्यासाठी पुतणे असलेल्या अजितदादांनी कोटींच्या निधीचा वर्षाव करून काकांच्या पिचवर गुगली टाकली आहे.**

### इंदापूर तालुक्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

इंदापूर तालुक्यातील प्रस्तावित जंक्शन एमआयडीसीसाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील सुमारे १३१ हेक्टर ५० आर जमीन महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाला हस्तांतरित करण्याचा महत्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. एमआयडीसी अस्तित्वात आल्यानंतर रोजगार निर्मिती होऊन इंदापूर तालुक्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्याचा फायदा तालुक्यातील स्थानिक जनतेबरोबरच आजूबाजूच्या तालुक्यालाही होणार आहे. हा निर्णय भरणे यांच्यासाठी 'गेम चेंजर' ठरू शकतो, त्याचा फायदा हे भरणे आगामी निवडणुकीत कशा पद्धतीने उचलतात, हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

### आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी २७२ कोटींची मान्यता

अजित पवार यांनी मोहोळ तालुक्यासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या आष्टी उपसा सिंचन योजनेसाठी २७२ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनेमुळे मोहोळ तालुक्यातील अनगर परिसरातील नऊ गावांतील ३ हजार ९०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे, त्याचा फायदा मोहोळ आणि माढा या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना होणार आहे. याचा फायदा आ. माने यांना होऊ शकतो.

विधानसभा आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर सोमवारी राज्य मंत्रीमंडळाची बैठक झाली. त्यात इंदापूर आणि मोहोळ मतदारसंघासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या योजनांना मंजुरी देण्यात आली. याचा फायदा इंदापूर आणि मोहोळ तालुक्यातील विद्यमान आमदारांना होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी इंदापूर आणि मोहोळ मतदारसंघासाठी मंत्रीमंडळ बैठकीत महत्वपूर्ण निर्णयांना मंजुरी दिली आहे. इंदापूर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दत्तात्रेय भरणेमामा, मोहोळचे आमदार यशवंत माने आणि माजी आमदार राजनमालक पाटील यांना विधानसभेसाठी बूस्टर डोस ठरणार आहे. त्याचा आगामी निवडणुकीत पाटील, माने आणि भरणे यांना ताकत मिळण्याची शक्यता आहे.

